# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

फोन : ०२०.२५६०१२०७
०२०.२५६०१२१७

परीक्षा विभाग
गणेशखिंड रोड
पुणे ४११००७

ईमेल: coe@unipune.ac.in
वेबसाईट: www.unipune.ac.in

संदर्भ/ परीक्षा/प्रमाणपत्र/5938 दिनांक : 3/1/2017

मा. प्राचार्य/ संचालक
संलग्न महाविद्यालये व मान्यता प्राप्त संस्था

विषय — महाविद्यालयीन पातळीवर आयोजित करावयाच्या
पदवीग्रहण समारंभाबाबत...

महोदय,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पदवीस्तरावरील (UG)पदवीप्रमाणपत्रांचे वितरण महाविद्यालयीन स्तरावर करण्याचा निर्णय विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेला आहे. पदवीप्रमाणपत्र वितरीत करण्यासाठीची मार्गदर्शक तत्वे मागील पदवीप्रदान समारंभावेळी आपणास पाठविण्यात आलेली आहेत. विद्यापीठाचा पदवीप्रदान समारंभ दि. ३०/१२/२०१६ रोजी संपन्न झाला असून महाविद्यालयास पदवीप्रमाणपत्रे पाठविण्यात येत आहेत. महाविद्यालयाचे परीक्षा अधिकारी यांनी पदवी प्रमाणपत्रे तपासून खात्री करुन ताब्यात घ्यावयाची आहेत. महाविद्यालयाने समारंभ घेऊन सन्मानपूर्वक विद्यार्थ्यांना पदवीप्रमाणपत्रांचे वाटप करावयाचे आहे. पदवीप्रमाणपत्रे मिळाल्यानंतर, दि. ३१ जानेवारी, २०१७ पर्यंत समारंभपूर्वक पदवीप्रमाणपत्राचे वितरण महाविद्यालयात करण्यात यावे. वितरीत न झालेली प्रमाणपत्रे महाविद्यालयाने विद्यापीठाच्या प्रमाणपत्र विभागात हस्तपोच करावीत व प्रत्यक्ष वितरीत केलेल्या प्रमाणपत्रांची संख्या प्रमाणित करून घ्यावी.

..२/

विद्यार्थ्यांना पदवीप्रमाणपत्र वितरीत केल्यानंतर उर्वरीत प्रमाणपत्रे विद्यापीठाकडे परत जमा करणे आवश्यक आहे. पदवीप्रमाणपत्र वितरण खर्चापोटी महाविद्यालयास प्रत्येक पदवी प्रमाणप़त्राकरीता रू ३५/— प्रमाणे विद्यापीठाकडून अर्थसहाय्य मंजूर करण्यात आले आहे. प्रमाणपत्र विभागाने प्रमाणित केलेल्या पदवीप्रमाणपत्रांची संख्या लेखा परीक्षणासाठी ग्राहय धरण्यात येणार आहे. पदवी वितरण समारंभाचा खर्च प्राप्त अर्थसहाय्या पेक्षा अधिक असेल तर अधिकचा खर्च विद्यार्थ्यांकडून महाविद्यालयाला मिळणा—या इतर शुल्क (Other fees) या अर्थशीर्षातून करण्यास मान्यता देण्यात येत आहे. मात्र त्यासाठी विद्यार्थ्यांकडून कोणतेही वेगळे शुल्क घेऊ नये. महाविद्यालयातील पदवी वितरण समारंभाचे आयोजन करताना समितीने घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्वांची काटेकोर पालन करावे व सनदशीर मार्गाने समारंभ घेण्यात यावा.

उपरोक्त सर्व सूचनांचे पालन करून पदवीग्रहण समारंभाचे नियोजन करावयाचे आहे.

डॉ अशोक चव्हाण
परीक्षा नियंत्रक 3.1.17.